न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडकरांना प्रदूषण मुक्त पाणी पुरवण्यास "फस्ट प्रायोरिटी"

## निघोजे बंधाऱ्याच्या पाहणीसाठी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचा दौरा; भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सूचवल्या विविध उपाययोजना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या जीवनवाहिन्या ठरलेल्या पवना आणि इंद्रायणी नद्यांतील वाढत्या प्रदूषणामुळे शहरवासीयांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी शहराचा दौरा केला. तसेच, इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याची प्रत्यक्ष पाहणी केली.

पवना आणि इंद्रायणी नद्यांमध्ये शहरी व औद्योगिक सांडपाणी थेट मिसळत असल्याने पाणी अत्यंत दूषित झाले आहे. या पाण्यात आरोग्यास घातक घटक आढळत असून भविष्यात कॅन्सरसारख्या आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ३५ लाख नागरिकांचे जीवन या नद्यांवर अवलंबून आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडली होती. त्यावेळी रावेत आणि निघोजे या बंधाऱ्यांची पाहणी करुन ठोस उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष पाहणी केली जाईल, असे आश्वासन पंकजा मुंडे यांनी दिले होते.


**(उर्वरित पान २ वर)**




### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक व्हावी...

» पवना व इंद्रायणी नदीतून थेट पाणीपुरवठा बंद करून स्वतंत्र पाइपलाइन योजना राबवणे. निगडी व चिखली जलशुद्धीकरण केंद्रांवर टर्शरी ट्रीटमेंट व ओझोनेशन युनिट बसवणे. नदी सुधार प्रकल्पांत अधिक STP समाविष्ट करणे. जैवविविधता उद्याने, वृक्षारोपण आणि पर्यावरणपूरक विकासावर भर द्यावा. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच, NRCD कडून प्रकल्पांना तात्काळ मंजुरी मिळावी. या करिता केंद्र सरकारकडे पाठपुरावा वाढवणे. सर्व प्रलंबित प्रकल्पांना गती द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी दिली.

### तात्काळ अपेक्षीत उपाययोजना...

» महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांमध्ये पवना नदीवर STP प्रकल्प तातडीने उभारणे. किवळे येथील २० एमएलडी STP प्रकल्पासाठी प्रलंबित GR त्वरित जारी करणे. रावेत व निघोजे बंधाऱ्यांवर अत्याधुनिक एरेटर बसवणे. प्रदूषण होणाऱ्या 'हॉटस्पॉट' ठिकाणी वर्षभरात STP सुरू करणे आणि त्यासाठी PMRDA मार्फत जलपर्णी काढण्याची स्वतंत्र निविदा प्रसिद्ध करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

"पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ४० लाख नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने रावेत आणि निघोजे बंधाऱ्यातील पाण्याच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. याबाबत तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात. यासाठी महापालिका, पीएमआरडीए आणि राज्य शासनाकडे आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात दोन्ही नद्यांचा सुधार प्रकल्प आणि शुद्ध पाणी पुरवठा याबाबत कालबद्ध कार्यक्रम हाती घेणार आहोत. पुणे महानगर क्षेत्रातील सर्वच नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी राज्य सरकार निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेत आहे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये वाढत्या उन्हामुळे एसी बसला मोठी मागणी

## आठ दिवसांत दररोज सरासरी 10.82 लाख प्रवासी; पीएमपीच्या इलेक्ट्रीक बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक गर्दी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत चालला आहे. यामुळे पीएमपीच्या वातानुकूलित (एसी) बसमधून प्रवास करण्यास प्रवासी प्रधान्य देत आहेत. एक ते 8 एप्रिल या आठ दिवसांच्या कालावधीत दररोज सरासरी 10 लाख 82 हजार 183 जणांनी एसी बसमधून प्रवास केला आहे

पुणे महानगर परिवहन महामंडळाची बससेवा शहरातील उत्तम सेवा मानली जाते. पीएमपीच्या बस पुणे ते पिंपरी चिंचवड शहरासह पीएमआरडीए भागात धावतात. त्यामुळे पीएमपीने प्रवास करणाऱ्यांमध्ये नोकदार, महिला, विद्यार्थी यांची संख्या मोठी आहे. प्रवाशांच्या सेवेसाठी पूर्वी डिझेल, सीएनजीच्या बस उपलब्ध होत्या. मात्र, मागील काही वर्षांत पीएमपीच्या ताफ्यात एसी इलेक्ट्रीक बस दाखल झाल्या आहेत




यंदा फेब्रुवारीपासून उन्हाचा चटका बसू लागला आहे. सध्या शहरात उन्हाचा पारा 40 ते 42 अंशावर पोहोचला आहे. त्यामुळे दुपारच्या वेळेस उन्हाचा चटका सहन होणार नसल्याने प्रवासी इलेक्ट्रिक बसची वाट पाहत थांबतात. कारण अन्य बसमधून प्रवास करताना नागरिक घामाघूम होत आहेत. त्यामुळे प्रवासी एसी बसची वाट पाहत थांबतात. अतिशय उत्तम सुविधा प्रवाशांना मिळत असल्याने इलेक्ट्रीक एसी बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त गर्दी होत आहे.

# नवीन प्रशासकीय इमारतीतून नागरिकांना अत्याधुनिक सेवा

## गुणवत्तेला प्राधान्य देत नवीन प्रशासकीय इमारतीचा प्रकल्प वेळेत पूर्ण करा : महापौर रवि लांडगे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत ही केवळ एक इमारत नसून नागरिकांना अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि आधुनिक सेवा देणारे केंद्र ठरणार आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता अबाधित राखत हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करावा. कोणतीही तडजोड न करता दर्जेदार काम व्हावे, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड येथील सायन्स पार्कजवळ उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुरू असलेल्या कामकाजाची महापौर रवि लांडगे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. यावेळी प्रकल्पाच्या प्रगतीची माहिती घेत विविध कामांच्या गुणवत्तेबाबत तसेच प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.





### महापौर रवि लांडगे यांची पाहणी

**» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. चिंचवड येथील सायन्स पार्क परिसरात उभारल्या जात असलेल्या या प्रकल्पाच्या प्रगतीबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. कामाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता राखणे अत्यंत महत्त्वाचे असून कोणतीही तडजोड होऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.**

### आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे नियोजन

**» महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नवीन इमारतीच्या कामकाजाबाबत माहिती देताना सांगितले की, प्रकल्पाचे काम नियोजनबद्ध आणि टप्प्याटप्प्याने सुरू आहे. गुणवत्ता, सुरक्षा आणि वेळेचे व्यवस्थापन या तीन महत्त्वाच्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. प्रत्येक कामावर बारकाईने देखरेख ठेवून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. या इमारतीमुळे नागरिकांना अधिक सक्षम आणि सुलभ सेवा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

याप्रसंगी नगरसदस्या सुप्रिया चांदगुडे, अनुराधा गोरखे, नगरसदस्य कुशाग्र कदम, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, अनिल भालसाखळे, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, बाळू लांडे यांच्यासह विनायक साठे, सुनील पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी कामाची गुणवत्ता अबाधित ठेवत प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांना अत्याधुनिक आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत ही शहराच्या वाढत्या गरजांचा विचार करून उभारली जात असून ती नागरिकांसाठी एक सक्षम, सुटसुटीत आणि तंत्रज्ञानाधारित सेवा केंद्र ठरणार आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांना विविध विभागांच्या सेवा एकाच छताखाली अधिक जलद, पारदर्शक आणि सोयीस्कर पद्धतीने उपलब्ध होतील. त्यामुळे कामाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता राखणे आणि निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने समन्वयाने काम करत कोणतीही तडजोड न करता दर्जेदार काम पूर्ण करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी इमारतीच्या कामकाजाबाबत माहिती देताना सांगितले की, नवीन इमारतीचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. गुणवत्ता, सुरक्षा आणि वेळेचे नियोजन या तिन्ही बाबींवर प्रशासनाचा विशेष भर आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने काम करत आहे.

मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी यावेळी नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाच्या प्रगतीबाबत सविस्तर माहिती दिली.

# 32 कोटींच्या पुलाला 22 कोटींची सजावट

## महापालिका आर्थिक संकटात असताना सांगवी-बोपोडी सेतू चर्चेत!

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी-बोपोडीदरम्यान मुळा नदीवर पुलाचे सुशोभीकरण करून विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्यासाठी सुमारे २१ कोटी ८७ लाख रुपये खर्च झाले आहेत. महापालिका आर्थिक संकटात असताना सुशोभीकरणावर इतका खर्च का? अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे.

पिंपरी चिंचवड व पुणे महापालिकेने केलेल्या मुळा नदीवरील पुलामुळे जुनी व नवी सांगवी, पिंपळे गुरव, दापोडी, बोपोडी, खडकी रेंजहिल्स, भोसलेनगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसराची 'कनेक्टिव्हिटी' वाढली. पुलाचे सुशोभीकरण, विद्युत रोषणाई, सौंदर्यीकरण महापालिकेने केले आहे. त्यासाठी दोन्ही बाजूंनी लोखंडी कमान उभारून रोषणाई करण्यात आली. याचे उद्‌घाटन आणि पुलाचे 'सरकार शितोळे सेतू' असे नामकरण महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते मंगळवारी (ता.७) झाले. मात्र, पुलाच्या कामाचा खर्च सुमारे ३२ कोटी रुपये आणि सौंदर्यीकरणाचा खर्च सुमारे २१ कोटी ८७ लाख रुपये झाला आहे. त्यामुळे सुशोभीकरणावर इतका खर्च करण्याची गरज होती का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



> “ पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावणे. त्यांना आधुनिक रूप देणे हे महापालिकेचे धोरण आहे. 'सरकार शितोळे सेतू'च्या सुशोभीकरणामुळे शहराच्या सौंदर्यवृद्धीलाही चालना मिळाली आहे. अशा उपक्रमांमुळे सकारात्मक बदल घडून येत असून भविष्यातही अशा प्रकल्पांवर भर दिला जाईल.
> - रवी लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड

# पिंपरी-चिंचवडकरांना प्रदूषण मुक्त पाणी पुरवण्यास “फर्स्ट प्रायोरिटी”



(पान १ वरून)

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील नियोजित दौऱ्यानुसार, पंकजा मुंडे यांनी निघोजे येथील बंधाऱ्याला भेट दिली. यावेळी महापौर रवि लांडगे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेता भाऊसाहेब भोईर, महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त अभिजीत चौधरी, मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे यांच्यासह महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, एमआयडीसी आणि पर्यावरण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# मुळा-मुठा नदी संवर्धनातून पुण्याच्या विकासाला नवी गती

## जलसंपदा विभागाचे महापालिकेला पत्र, 31 ऑगस्टपर्यंत साठा पुरवण्यासाठी जलसंपदा विभाग ॲक्शन मोडमध्ये.

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजनेअंतर्गत नदीपात्रात भर आणि नदीकाठाने भराव घालण्यात येणार असल्यामुळे १ हजार ५४४ एकर जमीन नव्याने निर्माण होणार आहे. या जमिनीवर अनेकविध प्रकारची बांधकामे केली जाणार असून, विविध सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. नदी परिसरात सीमाभिंतींची उभारणी, फिरण्यासाठी जागा, जिने, घाट, स्वच्छतागृहे, उपाहारगृहे, वाहनतळ, प्लाझा, पूल बांधण्यात येणार आहेत.

या शिवाय, योजनेअंतर्गत नदीकाठच्या १८० एकर सरकारी जागांवरही सुविधांच्या नावाखाली बांधकामे होणार आहेत. त्यामुळे सुमारे पाच हजार कोटी रुपयांची ही योजनेतून नदीकाठच्या परिसराचे रूपांतर सिमेंटच्या जंगलात तर होणार नाही ना, अशी शंका उपस्थित होत आहे.

सीमाभिंतींची उभारणी, फिरण्यासाठी जागा, जिने, घाट, स्वच्छतागृहे, उपाहारगृहे, वाहनतळ, प्लाझा, पूल या जमिनींवर बांधण्यात येणार आहेत. या जमिनीचे क्षेत्रफळ १३ लाख ८३ हजार ११० चौरस मीटर (१ लाख ४९ हजार चौरस फूट किंवा ३४२ एकर) एवढे असणार आहे. याशिवाय, अस्तित्वातील काही पूल, बंधारे, पदपथ, रस्ते, भिंती, इमारती, घाट पाडण्यात येणार आहेत. तेथे नव्याने बांधकाम होणार आहे.

नदीपात्रात काँक्रिटच्या किंवा दगडाच्या भिंती बांधल्यानंतर पूररेषेच्या आतील ६२५ हेक्टर (१ हजार ५४४ एकर) जागा मोकळी होणार आहे. या जागेचा वापर करून आर्थिक उभारणी प्रस्तावित करण्यात आली आहे. नद्यांना लागून असलेली ७३ हेक्टर (१८० एकर) सरकारी जमीन आहे. भर घालून तयार केलेल्या १ हजार ५४४ एकर जमिनीचे आणि १८० एकर सरकारी जागेचे भवितव्य या योजनेसाठी निर्माण करण्यात आलेल्या विशेष हेतू वहन कंपनीकडे (स्पेशल पर्पज व्हेइकल- एसपीव्ही) तसेच राजकारणी आणि प्रशासनाच्या हाती जाणार आहे, असा दावा पर्यावरणप्रेमीं आणि अभ्यासकांकडून करण्यात आला आहे.

पुण्यात मुळा-मुठा नदी संवर्धन आणि पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत मोठ्या प्रमाणावर विकास कामे हाती घेतली जात आहेत. नदीपात्रात भर घालून आणि नदीकाठ मजबुतीकरण करून तब्बल १ हजार ५४४ एकर नवी जमीन निर्माण होणार आहे. या जागेवर फिरण्यासाठी पदपथ, घाट, जिने, स्वच्छतागृहे, वाहनतळ, पूल आणि प्लाझा उभारण्याची योजना आहे. यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेल, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे.



### नदीपात्रात वाहनतळाबरोबरच प्लाझा

**» सीमाभिंतींची उभारणी, फिरण्यासाठी जागा, जिने, घाट, स्वच्छतागृहे, उपाहारगृहे, वाहनतळ, प्लाझा, पूल या जमिनींवर बांधण्यात येणार आहेत. या जमिनीचे क्षेत्रफळ १३ लाख ८३ हजार ११० चौरस मीटर (१ लाख ४९ हजार चौरस फूट किंवा ३४२ एकर) एवढे असणार आहे. याशिवाय, अस्तित्वातील काही पूल, बंधारे, पदपथ, रस्ते, भिंती, इमारती, घाट पाडण्यात येणार आहेत. तेथे नव्याने बांधकाम होणार आहे.**

### बांधकामावर ८० टक्के खर्च

**» योजनेतील अंदाजपत्रकात असलेल्या माहितीनुसार ८० टक्के खर्च हा वेगवेगळ्या प्रकारच्या बांधकामांवर होणार आहे. अंदाजपत्रकामध्ये नदीतील पाणी शुद्ध करणे किंवा स्वच्छ करणे याचा कोणताही उल्लेख नाही. काँक्रिट आणि दगडाच्या भिंतींमुळे नदीचे पुनरुज्जीवन कसे होणार, असा प्रश्न या निमित्ताने पुढे येत आहे.**

> **मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजनेबाबत आक्षेप असले, तरी योजनेमुळे निश्चित फायदा होणार आहे. विकासाच्या दृष्टीने ही योजना उपयुक्त ठरणार आहे.**
>
> **- मंजूषा नागपुरे, महापौर, पुणे महापालिका**

# पाण्याचा एक थेंबही कमी करू देणार नाही! श्रीनाथ भिमाले यांचा जलसंपदा विभागाला इशारा

## जलसंपदा विभागाची 15 टक्के पाणीकपातीची मागणी श्रीनाथ भिमाले यांनी धुडकावली; पुणेकरांच्या हक्काच्या पाण्यासाठी महापालिका ठाम

**पुणे | प्रतिनिधी**

शहराचे पाणी कमी करण्याबाबत अनेक पत्रे येतात. अशी कितीही पत्रे आली, तरी पुणेकरांचे एक थेंबही पाणी कमी करून देणार नाही, अशी आक्रमक भूमिका महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी घेतली आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीतील पाणी ३१ जुलैपर्यंत शहर, तसेच ग्रामीण भागास देण्यासाठी महापालिकेने १५ टक्के पाणीकपात करावी,

अशी मागणी जलसंपदा विभागाने महापालिकेकडे केली आहे. याबाबत बोलताना पाणी कपातीस विरोध असल्याचे भिमाले यांनी स्पष्ट केले. भिमाले म्हणाले, की शहरात मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई आहे. आधीच पुणेकरांना पुरेसे पाणी मिळत नाही. महापालिकेच्या मुख्य सभेत सर्वपक्षीय नगरसेवकांनी याबाबत तक्रारी केल्या होत्या.

त्यानंतर आयुक्तांना प्रत्येक प्रभागात बैठका घेऊन त्यानुसार पाण्याची सद्यस्थिती काय आहे, काय उपाययोजना केल्या जातील, कशामुळे तुटवडा जाणवत आहे, याबाबत स्थायी समितीत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. प्रशासन त्यानुसार बैठका घेत असून, पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.

त्यामुळे आधीच पाणी नसताना त्यात पुन्हा कपात केल्यास नागरिकांची गैरसोय होणार आहे. त्यामुळे पुणेकरांचे एक थेंबही पाणी कमी करू दिले जाणार नाही. पाण्याच्या निर्णयाबाबत प्रशासनाची बैठक होणार असली, तरी त्यांनाही स्पष्ट सूचना केल्या जातील

पाणी कपाती बाबत देण्यात आलेल्या नोटीसीवर बोलताना काही समिती अध्यक्ष हिमालय म्हणाले, शहरात पाणीकपात करावी असे पत्र जलसंपदा विभागाने महापालिकेला पाठविले आहे. महापालिकेला कितीही पत्रे आली, तरी आम्ही कुठल्याही परिस्थितीमध्ये शहरात पाणीकपात होऊ देणार नाही.



### पाणी कपातीला ठाम विरोध

**» पुणे शहरातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणी कपातीच्या प्रस्तावाला स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ठाम विरोध दर्शविला आहे. जलसंपदा विभागाने १५ टक्के पाणी कपातीची मागणी केली असली, तरी पुणेकरांचे एक थेंबही पाणी कमी करू देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली. शहरात आधीच अनेक भागांत अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असेही भिमाले यांनी सांगितले.**

# शर्तभंग झालेल्या जमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया लवकरच

## 220 जमिनी ताब्यात घेण्याचा निर्णय; जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

शहर आणि जिल्ह्यातील शर्तभंग झालेल्या २२० प्रकरणांची माहिती जिल्हा प्रशासनाला उपलब्ध झाली असून, त्या अनुषंगाने एप्रिल महिनाअखेरपर्यंत या जागा ताब्यात घेण्यात येणार आहेत. त्या बाबतची सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड शहरासह जिल्ह्यात सरकारने भाडेतत्त्वावर अथवा कब्जेहक्काने दिलेल्या वर्ग दोनच्या जमिनी, वेतन, आदिवासी, देवस्थानसाठी दिलेल्या एकूण ३५३ प्रकरणांमध्ये शर्तभंग झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंढवा आणि ताथवडे येथील शासकीय जमीन गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर हा शर्तभंग करणाऱ्या देवस्थानांना नोटीसा बजाविण्यात आल्या होत्या. या संदर्भात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी शहरासह जिल्ह्यातील तहसीलदार, उपविभागीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

पुणे, पिंपरी चिंचवड शहरासह जिल्ह्यातील २ हजार १०० प्रकरणांमध्ये सरकारी जमिनी भाडेतत्त्वावर देण्यात आल्या आहेत. त्या संदर्भात भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनींचा योग्य कारणासाठी वापर झाला, की नाही याची शहानिशा करणारा अहवाल तहसीलदारांकडून मागविण्यात आल्या होता. त्या बाबत भाडेपट्टेधारकांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ३५३ प्रकरणांमध्ये शर्तभंग झाल्याचे उघड झाले आहे. वतन, देवस्थानला निवासी वापरासाठी दिलेल्या जमिनींचा व्यावसायिक वापर करणे, जमीन भाडेकराराने देऊन उत्पन्न मिळविणे, मूळ लाभार्थ्यांव्यतिरिक्त नव्या सदस्यांचा समावेश करणे आणि निर्धारीत कालावधीत जमिनींचा वापर न करणे या कारणास्तव शर्तभंग झाल्याचे निदर्शनास आले आहे.

शहर आणि जिल्ह्यातील शर्तभंग झालेल्या २२० प्रकरणांची माहिती जिल्हा प्रशासनाला उपलब्ध झाली असून, त्या अनुषंगाने एप्रिल महिनाअखेरपर्यंत या जागा ताब्यात घेण्यात येणार आहेत. शर्तभंगाबाबत आवश्यक दंड भरून जमीन नियमित करण्याची मुदत संपुष्टात आल्याने जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. तहसीलदार, उपविभागीय अधिकाऱ्यांकडून आलेल्या अहवालातून ३५३ प्रकरणांत शर्तभंग झाला असला, तरी त्यापैकी २२० प्रकरणांची माहिती जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाली आहे. ही माहिती तपासून घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना केली. शर्तभंगाच्या अनुषंगाने एप्रिल महिन्याच्या अखेरीस २२० प्रकरणांमध्ये शर्तभंगाच्या जमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.



### २२० जमिनी ताब्यात घेण्याची तयारी

**» शर्तभंग झालेल्या ३५३ प्रकरणांपैकी २२० प्रकरणांची माहिती जिल्हा प्रशासनाकडे उपलब्ध झाली आहे. या प्रकरणांची पडताळणी करून एप्रिल महिन्याच्या अखेरीस संबंधित जमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या असून, कारवाईसाठी प्रशासन सज्ज झाले आहे.**

### ३५३ प्रकरणांत शर्तभंग उघड

**» पुणे व पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील सरकारी जमिनींच्या वापराबाबत केलेल्या तपासणीत ३५३ प्रकरणांत शर्तभंग झाल्याचे समोर आले आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला. भाडेतत्त्वावर किंवा कब्जेहक्काने दिलेल्या जमिनींचा नियमबाह्य वापर केल्याचे आढळून आले आहे. यामुळे प्रशासनाने या प्रकरणांची गांभीर्याने दखल घेतली आहे.**

### नियमभंगाचे प्रकार उघड

**» जमिनींचा व्यावसायिक वापर, भाडेकरार करून उत्पन्न मिळविणे, मूळ लाभार्थ्यांऐवजी इतरांचा समावेश करणे तसेच निर्धारित कालावधीत वापर न करणे असे विविध प्रकारचे नियमभंग आढळले आहेत. मुदत संपूनही दंड भरला नसल्याने प्रशासनाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले की, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पुढील काळातही मोहीम सुरू राहणार आहे.**

# पुणे आरटीओची दमदार कामगिरी; 1922 कोटी महसूल वसुली

## ई-चालान, वाहन नोंदणी व एचएसआरपीमधून मोठी कमाई; आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये विक्रमी यश

**पुणे | प्रतिनिधी**

आरटीओने आर्थिक वर्षात (सन 2025-26) 1922.12 कोटी रुपये महसूल वसूल करीत 101.42 टक्के महसूलप्राप्तीची उद्दिष्टपूर्ती केली आहे. पुणे आरटीओ कार्यालयासाठी शासनाने 1895.17 कोटींचे उद्दिष्ट निर्धारित केले होते. परंतु, त्यापेक्षा अधिकचा महसूल वसूल करण्याची कामगिरी पुणे आरटीओने केली आहे.

रस्ता सुरक्षा अंमलबजावणी अंतर्गत तपासणीत दोषी आढळलेल्या 61 हजार 509 वाहनांवर ई-तपासणी कारवाई करीत त्यातून 25.68 कोटींचा महसूल गोळा केला आहे. तसेच, 1 लाख 86 हजार 824 वाहनचालक अनुज्ञप्ती व 5 हजार 584 आंतरराष्ट्रीय वाहन परवाने जारी केले आहेत.

थकीत मोटार वाहन करापोटी 32.23 कोटी रुपये व पर्यावरण करापोटी 9.80 कोटी रुपये महसूल वसूल केला आहे. ई-लिलावाद्वारे 193 वाहनांच्या विक्रीतून 1.06 कोटींचा महसूल मिळाला.

आर्थिक वर्षात (सन 2025-26) 1922.12 कोटी रुपये महसूल वसूल करीत 101.42 टक्के महसूलप्राप्तीची उद्दिष्टपूर्ती केली आहे. पुणे आरटीओ कार्यालयासाठी शासनाने 1895.17 कोटींचे उद्दिष्ट निर्धारित केले होते. परंतु, त्यापेक्षा अधिकचा महसूल वसूल करण्याची कामगिरी पुणे आरटीओने केली आहे.

कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात 11 लाख 18 हजार 844 वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसविल्या असून, 3 लाख 45 हजार 543 नवीन वाहनांची नोंदणी केली आहे. तसेच, 56 हजार 172 पसंती क्रमांक आरक्षित करून त्यातून 73.76 कोटी रुपयांचा महसूल मिळविण्यात आला, अशी माहिती प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिली आहे.




**“ सन 2025-26 या आर्थिक वर्षात महसूलवसुली, अंमलबजावणी व आनुषंगिक कामकाजाबाबत उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली आहे. शासनाने निर्धारित केलेल्या 1895.17 कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत आरटीओ कार्यालयाने 1922.12 कोटी रुपये महसूल वसूल करीत 101.42 टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली. कार्यालयाकडील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हे उद्दिष्ट पूर्ण करून अधिकचा महसूल प्राप्त करण्यात यश मिळाले आहे.**

**- अर्चना गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे**